**नियमित फौजदारी खटला क्र. २१२/२०२२**
**(सरकार – वि – रामकृष्ण)**
**निशाणी क्र. ०८.**

**शासनातर्फे सा.क्र.०२ यांची जबानी**
**मी याद्वारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,**

| | | |
|---|---|---|
| **माझे नांव** | – | एकनाथ कैलाश कडू, |
| **वय** | – | २७ वर्षे, |
| **व्यवसाय** | – | शेती, |
| **रा.** | – | माळेगाव, ता. सावनेर, जि. नागपूर. |

**सरतपास सहा.सरकारी वकील श्री. टी. एस. आरगे यांचे मार्फत**

**०१.** पोलीसांनी मला पंचनाम्यासाठी बोलावले नव्हते तसेच माझ्यासमक्ष पंचनामा केला नव्हता. पोलीसांनी माझी सही मी आमच्या गावच्या बसस्टॅंडवर बसलो असतांना घेतली होती. आता मला घटनास्थळ जप्ती पंचनामा दाखवला, त्यावर माझी सही आहे, त्यातील मजकूर माहित नाही.

**साक्षीदार आपल्या पुर्वीच्या जबाबापेक्षा विसंगत सांगत असल्यामुळे सहा. सरकारी वकीलांनी त्यास उलट तपासात अनुज्ञेय असणारी उत्तरसुचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागीतली. परवानगी मंजुर.**

**०२.** हे म्हणणे खरे नाही की, दि. ३०/०५/२०२२ रोजी पोलीसांनी मला अदानी कंपनी, माळेगाव येथे पंचनाम्याकरीता बोलवले होते. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी फिर्यादी नितीन वाघमारे यांनी आम्हाला घटनास्थळ दाखवले. हे म्हणणे खरे नाही की, त्यानंतर पोलीसांनी घटनास्थळाची पाहणी करुन तेथून एक लोखंडी रॉड जप्त केला तसेच घटनास्थळ जप्ती पंचनामा तयार केला, तो पोलीसांनी मला वाचून दाखवला व त्यानंतर मी त्यावर सही केली. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीस

वाचवण्यासाठी खोटी साक्ष देत आहे.

**०३.** **सरतपास पुर्ण.**

**उलट तपास आरोपीतर्फे– स्वतः आरोपी.**

**०४.** **नाकारला.**

माझ्या समक्ष/श्रवणोत्तर स्वीकृत

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by THAKUR PRADEEPSINGH
Date: 2026.04.06 15:01:23 +0530

(प्रदिपसिंह पी. ठाकूर)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी
[न्यायालय क्र.०१], सावनेर

सावनेर.
दिनांक– ०६/०४/२०२६

<u>नियमित फौजदारी खटला क्र. २१२/२०२२</u>
(सरकार – वि – रामकृष्ण)
<u>निशाणी क्र. ०९.</u>

**शासनातर्फे सा.क्र.०३ यांची जबानी**
**मी याद्वारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,**

| | | |
|---|---|---|
| माझे नांव | – | नितीन प्रकाशराव वाघमारे, |
| वय | – | ४३ वर्षे, |
| व्यवसाय | – | खाजगी नोकरी, |
| रा. | – | मुखबधीर शाळेजवळ, वार्ड क्र. ०४, सावनेर, ता. सावनेर, जि. नागपूर. |

**सरतपास सहा. सरकारी अभियोक्ता श्री. टी. एस. आरगे यांचे मार्फत**

**०१.** सन २०२२ मध्ये अडाणी सोयाबीन कंपनी, पंधराखेडी रोड, मानेगाव येथे सोयाबीन तेल पॅकींगचे तसचे जे काम देतील ते काम करत होतो. मी रामकृष्ण धरणेश्वर याला ओळखतो, तो माझ्यासोबत कंपनीत काम करत होता. अंदाजे सात आठ वर्षांपूर्वी कंपनीतून सूट्टी झाल्यानंतर सकाळी ८.१५ वाजताच्या दरम्यान मी बाहेर निघालो. त्याअगोदर सकाळी ६.३० वाजता रामकृष्ण वरती झाडू मारत होतो व त्याचा कचरा खालती गाड्या लागतात तेथे पडला होता, त्यामुळे सदरची बाब मी सुपरवायझरला सांगितली. कंपनीच्या अंदर माझी व रामकृष्णमध्ये तोंडातोंडी झाली होती. त्यानंतर ८.१५ वाजताच्या दरम्यान मी कपंनीतून बाहेर निघाल्यावर कंपनीच्या गेटजवळ रामकृष्णने काही न सांगता रॉडने माझ्या डाव्या हातावर मारायला सुरु केले. त्यामुळे मी खाली पडलो. त्यानंतर मी घरी गेलो व मोठ्या भावाला सांगितले व पोलीस स्टेशनला गेलो व तेथे रिपोर्ट दिली होती. आता मला फिर्याद दाखविली, त्यावर माझी सही आहे, त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यास

**<u>निशाणी क्रं. P10/PW3</u>** देण्यात येते. आता मला छापील प्रथम खबर अहवाल दाखविला, त्यावर माझी सही आहे, त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यास **<u>निशाणी क्रं. P11/PW3</u>** देण्यात येते. आरोपी मला मारतांना सुपरवायझरला का बोलला असे म्हणत होता, त्याव्यतिरिक्त अजुन काही म्हणाला नाही. ज्या रॉडने मला मारहाण झाली, ते मला दाखवल्यास मी ओळखू शकतो. आता मला जप्त मुद्देमाल जी.पी. क्र. १६/२०२६ वरील रॉड दाखवला, हा तोच रॉड आहे ज्याने मला मारहाण केली होती. सदर रॉडला **<u>खूण-MO-1</u>** देण्यात येते. आरोपीला पाहिल्यास मी ओळखू शकतो, तो आज न्यायालयात हजर आहे.

**०२.** **सरतपास पुर्ण.**

**<u>उलट तपास आरोपीतर्फे-श्री. पी.एन.काळे, वकील</u>.**

**०३.** मी पोलीसांना फिर्याद व बयाण देतांना, आरोपी सकाळी ६.३० वाजता झाडू मारत होता व त्याचा कचरा खालती गाड्या लागतात तेथे पडला होता, तसेच त्यानंतर ८.१५ वाजताच्या दरम्यान मी कपंनीतून बाहेर निघाल्यावर कंपनीच्या गेटजवळ आरोपीने मला काही न सांगता मारायला सुरु केले तसेच आरोपीने आरोपीने मला मारतांना सुपरवायझरला का सांगितले असे म्हणत होता, या सर्व बाबी सांगितल्या होत्या. परंतू सदरच्या बाबी माझे फिर्याद व बयाणात का नमूद केल्या नाही, याचे कारण मी सांगू शकत नाही.

**०४.** हे म्हणणे खरे आहे की, खून-MO-1 वरील रॉड दोन्ही बाजूने निमुळता नाही तसेच दोन्ही बाजूने टोकदार देखील नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी रिपोर्ट वाचली नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, त्या रिपोर्टमध्ये काय लिहले आहे हे मला माहित नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी माझा मित्र होता. हे म्हणणे खरे

नाही की, आरोपीने मला पैसे उधार दिले होते व ते पैसे त्याने मला परत मागितले म्हणून मला त्यास पैसे परत करायचे नसल्यामुळे मी त्याच्याविरुध्द खोटी फिर्याद दिली. हे म्हणणे खरे नाही की, मी सायकलने जात असतांना मी रोडवर खाली पडलो व त्यामुळे माझ्या हाताला मार लागला. हे म्हणणे खरे नाही की, मी तसेच आरोपी कधीही अदानी सोयाबीन कंपनीत कामाला नव्हतो. हे म्हणणे खरे नाही की,आरोपीने मला MO–1 वरील रॉडने मारल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने मला कधीही मारहाण केली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी सांगितलेला सरतपासातील सर्व मजकूर खोटा आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

०५. **उलटतपास पुर्ण.**

०६. **फेरतपास काही नाही.**

माझ्या समक्ष/श्रवणोत्तर स्वीकृत

Digitally signed by THAKUR PRADEEPSINGH
Date: 2026.04.06 15:01:29 +0530

(प्रदिपसिंह पी. ठाकूर)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी
[न्यायालय क्र.०१], सावनेर

दिनांक– ०६/०४/२०२६

# CERTIFICATE

"I affirm that the contents of this P. D. F. File is word to word as per original."

Name of Stenographer : S. A. Misal